# गडचिरोली जिल्हयातील आदिवासी समुदायाच्या विकासात आदिवासी लोकप्रतिनिधी व नेतृत्वाच्या भुमिकेचे अध्ययन

**प्रा. डॉ. गणेश बी. खुणे** महात्मा ज्योतिबा फुले कला महाविद्यालय आष्टीता. चामोर्शी, जि. गडचिरोली.

**गोषवारा :–**

महाराष्ट्रातील अविकसीत व 38 : च्या घरात आदिवासी जमात असणाऱ्या गडचिरोली जिल्हयातील विकासाची स्थिती सर्वपरिचीत आहे. जिल्हयात लोकसभा व विधानसभेकरिता अनूसुचित जमातीकरिता राखीव क्षेत्र आहे. या क्षेत्रातील विकास स्थिती लक्षात घेता, लोकप्रतिनिधीचे विकास कार्यात स्वारस्य नसल्याचे दिसून येते. आरक्षणाच्या आधारावर मिळालेल्या संधिचा हा समाज फायदा घेत नसून अकार्यक्षम नेतृत्वाअभावी अध्ययन क्षेत्र हे मुलभूत समश्याग्रस्त आहे. अनेक समश्या आवासून उभ्या आहेत. रस्ते, विज, पाणी, सिंचन, उदयोग, रोजगार, आरोग्य, शिक्षण अशा अनेक समश्या या क्षेत्रात दिसून येतात. या समश्या सोडविण्यास सदर नेतृत्व अपयशी ठरले आहे. त्यामुळे मतदार नेहमी आपला कौल बदलतात. त्यामुळे नेतृत्व बदल नेहमी होत असल्याचे समोर येते. याच कारणामुळे अध्ययन क्षेत्रातील नेतृत्व राज्य व राष्ट्र पातळीवर आपली छाप निर्माण करू शकलेले नाहीत.

**बिजसंज्ञा :–**

गडचिरोली जिल्हा, आदिवासी समुदाय, आदिवासी लोकप्रतिनिधी, आदिवासी नेतृत्व,लोकप्रतिनिधींचे विकास कार्य, नौकरशाहीचा कामचुकारपणा, आदिवासी उपयोजना, आदिवासी विकासाची स्थिती

**प्रस्तावना :–**

भारतीय समाजातील काही घटक विषमताविरोधी जाती व्यवस्थेमुळे अनेक प्रकारच्या निर्बधांनी जखडलेले, उपेक्षित, मागास व वंचित राहिलेले आहेत. याची जाणीव संविधानकारांना होती. म्हणुन संविधानकारांनी त्या संदर्भातिल तरतूदी संविधानात केल्या.

त्याबरोबरच नियोजनबध्द आर्थिक विकासाचा मार्ग निवडुन भारताने पंचवार्षिक योजना अंमलात आणण्यास 1951 मध्ये सुरूवात केली "तृतिय पंचवार्षीक योजना काळात भारतात एकूण 238 आदिवासी विकास खंड निर्माण करण्यात आले. त्यातील 18 महाराष्ट्रात होते."[1] आदिवासी विकासाची स्थिती लक्षात घेता 1983 मध्ये मंत्रालय पातळीवर आदिवासी विकास विभाग स्थापन करण्यात आला. एकात्मीक आदिवासी विकास कार्यक्रमही हाती घेण्यात आला. पाचव्या पंचवार्षीक योजनेच्या वेळी आदिवासी उपयोजना ही संकल्पना स्विकारली गेली व आजतागायत ती राबविली जात आहे. या उपयोजनेची दोन उददीष्टये आहेत. 1) अनुसुचित जमातीचा सामाजिक, आर्थिक विकास 2) आदिवासीचे शोषनापासून रक्षण व आदिवासीच्या हितसंबंधाचे संवर्धन. याचा फायदा आज 19 राज्ये व केंद्रशाषीत प्रदेशातील आदिवासींना मिळत आहे. याची अमंलबजावणी 191 एकात्मीक आदिवासी प्रकल्प व 74 क्लस्टर एरीया यांच्यामार्फत होत आहे. "आदिवासीचे जिवन अति कष्टाचे मागासलेले व यातनापूर्ण आहे. अपूरी व अप्रगत शेती, कर्जबाजारीपणा, वेठबिगाार पदधती, व्यापारी, सावकार, जमिन मालकांकडून होणारे शोषन व प्रगत समाजाशी आलेल्या संपर्कामे निर्माण झालेले नवनविन प्रश्न यामुळे आदिवासी समुदाय आपले स्वत्व गमावून बसला आहे."[2]

आदिवासींच्या विकासासाठी शासनाच्या 300 योजना असून त्या विविध विभागांमार्फत चालविण्यात येतात. "मा. अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रीमंडळाने सर्वप्रथम आदिवासी विकासासाठी स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करून त्यास आदिवासी व्यवहार मंत्रालय असे नांव देण्यात येउन कॅबिनेट दर्जाचा मंत्री त्याचा प्रमुख व राज्य दर्जाचा मंत्री त्यात देण्यात आला."[3] इतक्या योजना असतांना आदिवासीच्या स्थितीमध्ये कितपत बदल जाणवतो व या स्थितीत बदल घडवुन आणण्यासाठी आदिवासी लोकप्रतिनीचे प्रयत्न व कार्य यासंदर्भात आदिवासी समुदायाच्या समाधानाने स्पष्टीकरण करने अविवार्य ठरते. गडचिरोली जिल्हयात आदिवासी समुदाय हा 38 : च्या घरात आहे. सोबतच हया संपूर्ण जिल्हयातील तिनही विधानसभा क्षेत्र व लोकसभा क्षेत्र आदिवासी समुदायाच्या व्यक्तीसाठी राखीव आहे. आरक्षित असल्याने त्याच समुदायातील नेतृत्वाला सदर आदिवासी जिल्हयातील समस्यांच्या जाणीव असणे सहज आहे. त्यामुळे या जिल्हयातील आदिवासी नेतृत्व कितपत कार्यक्षम असून ते आदिवासींच्या विकासकार्यासंबधी कितपत सहकार्य करता यासंदर्भात आदिवासी समुदायाची नेतृत्वासंबधी भावना तपासने अगत्याचे ठरते.

**संशोधन क्षेत्र :–**

संशोधन क्षेत्र गडचिरोली जिल्हयापुरते मर्यादित असून जिल्हयात येणारी तिनही विधानसभा क्षेत्रे आरमोरी, गडचिरोली व सिरोंचा यांचा समावेश अध्ययन क्षेत्रात केला गेला आहे.

**संशोधन पध्दती :–**

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे.

**नमुना निवड :–**

अध्ययन क्षेत्र विस्तृत असल्याने संशोधनाशी संबधित प्रत्येक एककाशी संपर्क करणे अशक्य होते. त्यामुळे समग्रातुन नमुना म्हणुन 600 एककांची निवड केली गेली. याकरीता नमुना निवडीच्या सोईस्कर यादृष्टीने नमुना निवड पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाचे महत्व :–**

गडचिरोली हा आदिवासी बहुल जिल्हा असून सदर जिल्हयातील तिनही विधानसभा क्षेत्र व लोकसभा क्षेत्र आदिवासी समुदायातील व्यक्तीसाठी राखीव आहे. राखीव असल्याने आदिवासी समूदायातील व्यक्तीला सदर जिल्हयातील नेतृत्व करण्याची संधी प्राप्त होत आहे. याच समुदायातील असल्याने सदर समुदायाच्या समस्या त्यांना अगदी जवळून पाहिल्या आहेत. त्यामुळे सदर समुदायाच्या समस्यांचे निराकरण करून या समुदायाचा विकास झपाटयाने सदर नेतृत्वाने करने अनिवार्य आहे. त्यामुळे या जिल्हयातील आदिवासी नेतृत्व या समाजाच्या समस्या निवारणार्थ कितपत यशस्वी ठरले. या

जिल्यातील विकासकार्य झपाटयाने पूर्ण झालीत किंवा नाही किंवा नेतृत्व उदासिन राहीले आहेत काय? त्यांच्या कार्यामुळे ही जमात कितपत समाधानी झाली आहे याचा अभ्यास करने महत्वाचे ठरते.

**संशोधनाची उदिदष्टये :–**

1) संशोधन क्षेत्रातील नेतृत्वाची सक्रियता तपासने.
2) संशोधन क्षेत्रातील विकास कार्याचा आढावा घेणे.
3) आदिवासी जनता नेतृत्वाच्या काम करण्याने कितपत समाधानी आहे हे तपासणे.
4) लोकप्रतिनीधी व निमशासकीय कर्मचारी यांच्याही विकास कार्यासंबधीच्या भूमिकेचा शोध घेणे.
5) अध्ययन क्षेत्रातील नेतृत्व राज्य व राज्यस्तरावरील आहे किंवा नाही या बाबींचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहितके :–**

1) संशोधन क्षेत्रातील नेतृत्व विकास कार्यासंबधी उदासिन आहेत.
2) संशोधन क्षेत्रात अजूनही मुलभुत समस्या आवासुन उभ्या आहेत.
3) आदिवासी जमात नेतृत्वाच्या कार्यामुळे समाधानी आहे.
4) लोकप्रतिनीधीसोबतच नौकरशाहीसुध्दा विकास कार्यासंबंधी तत्पर आहे.
5) अध्ययन क्षेत्रातील नेतृत्व राज्य व राष्ट्रस्तरावर चमकलेले नाहीत.

**सारणी क. 1**
**गेल्या पाच दशकात आदिवासी समुदायाचा विकास झाला किंवा नाही**
**यासंदर्भातिल वारंवारिता दर्शक सारणी**

| अ.क्र | प्रतिसाद | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 70 | 11.67 |
| 2 | नाही | 360 | 60 |
| 3 | माहित नाही | 170 | 28.33 |
| 4 | एकुण | 600 | 100 |

**उत्तर नाही असल्याच्या कारणांची मिमांसादर्शक सारणी.**

| अ.क्र | प्रतिसाद | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | प्रशासनाचा कामचुकारपना | 81 | 13.5 |
| 2 | शासनाचे दुर्लक्ष | 86 | 14.33 |
| 3 | लोकप्रतिनीधीचे प्रयत्न कमी पडले | 76 | 12.67 |
| 4 | नियोजनाचा अभाव | 50 | 8.33 |
| 5 | समुदायाचा अशिक्षितपणा | 67 | 11.17 |
| | एकुण | 360 | 80 |

उपरोक्त सारणीवरून 70 मतदार (11.67:) आदिवासी समुहाचा विकास झाला असे मत मांडतात. तर 360(60:) मतदार विकास झालेला नाही असे मत मांडतात. तर 170 (28.33:) मतदार आपल्या निरक्षरतेमुळे त्या विषयक माहिती नसल्याचे सांगतात. नकारात्मक उत्तर देण्याऱ्या उत्तरदात्यांपैकी 81 (13.5:) उत्तरदाते प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या कामचुकारपणाला दोष देतात. तर 86(14.33:) मतदार लोकप्रतिनीधींना दोषी धरतात तर 50(8.33:) मतदार नियोजन निट न झाल्यामुळे हा समाज प्रगती करू शकत नाही असे म्हणतात.

यावरून असे स्पष्ट होते की या समुदायातील मतदारांना स्वतःच्या प्रगतीची कल्पना आहे. हा समाज विकासाचा दृष्टीने धरपडत असून सद्यःस्थीतीत विकास वाटेच्या कोणत्या टप्प्यावर आहे याची जाणीव या समाजाला आहे सोबतच एवढया शासनाच्या योजना व विकासकार्य जिल्हयातील जनतेकरीता राबवून सुध्दा हा समुदाय विकसीत झालेला नाही. यावरून नौकरशाही, शासनाचे धोरण, योजना संबधीत मर्यादाही स्पष्ट होतात. सोबतच विकास न होण्यामागचा दोष हा समुदाय शासनाला देतो. शासनाने पुरेपुर लक्ष पुरविले असते तर हा अभिशाप समुदायात शिल्लक राहिला नसता. या जिल्हयातील नौकरशाही फक्त वेतनभोगी असून कुचकामी आहे. कर्मचारी मुख्यालयी राहत नसून स्वतःच्या कुटुंबाच्या भवितव्यासाठी शहराकडे धाव घेत आहेत. ते कधी नक्षलवाद तर कधी घनदाट जंगल, रस्त्याच्या अभाव ही कारणे समोर करून समुदायाच्या विकासाकडे पाहीजे त्या प्रमाणात लक्ष देत नाहीत. सोबतच नियोजनपूर्ण अभाव व लोकप्रतिनीधीची या क्षेत्रात काम न करण्याची रूची व अशिक्षित आदिवासी समुदाय ही सुध्दा कारणे विकास न होण्यासाठी कारणीभुत आहेत हे स्पष्ट होते.

**सारणी क. 2 लोकप्रतिनीधीच्या कार्यामुळे मतदारांच्या समाधानाची स्थितीदर्शक सारणी**

| अ.क्र | प्रतिसाद | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 60 | 10: |
| 2 | नाही | 490 | 81.67: |
| 3 | माहित नाही | 50 | 8.33: |
| | एकुण | 600 | 100 |

उपरोक्त सारणीत 60(10:) मतदार लोकप्रतिनिधीच्या कामामुळे समाधानी असल्याचे सांगतात तर एकुण 490(81.67:) मतदार लोकप्रतिनीधीच्या कार्य करण्यावर नाराजी व्यक्त करतात. 50(8.33:) मतदार मात्र याविषयी काहीही माहिती नसल्याचे सांगतात.

उपरोक्त सारणीवरूण असे निष्कर्ष समोर येतो की, या जिल्हयातील आमदार विकासाप्रती निष्क्रीय आहेत. त्यांना आदिवासी जनतेच्या विकासाशी काहीही घेणे देणे नाही. निवडणुक आल्यानंतर फक्त नावासाठी लोकप्रतिनीधी म्हणुन मिरवणे मात्र विकास कामांच्या बाबतीत झिरो असणे अशी स्थिती समोर येते. आदिवासी समुदाय इतर समाजाच्या तुलनेत मागासला असल्याची कारणे म्हणून या जिल्हयातील लोकप्रतिनिधीची विकासप्रती असलेली अरूची आहे. त्यामुळे शासनाच्या कोणत्याही विकास योजना असल्या तरी पण नेतृत्वा अभावी त्या पूर्णत्वास जाउ शकत नाही. त्यामुळे आदिवासी मतदारांनी वेळीस सचेत राहुन लोकप्रतिनीधीवर लक्ष केंद्रीत करावे अन्यथा त्यांना पूर्वीप्रमाणेच हलाकीचे जिवन जगावे लागेल व हा समाज इतर समाजापेक्षा मागासला राहण्याची चिन्हे दिसत आहेत. याची दखल लोकप्रतिनीधींनी घेउन लवकरात लवकर स्वतःला कार्यक्षम बनवून विकासाभिमुख कार्य करण्यावर जोर दयावा.

**सारणी क. 3 अध्ययन क्षेत्रातील राष्ट्रीय व राज्यस्तरावरील नेतृत्वासंबंधी मतदर्शक सारणी**

| अ.क्र | प्रतिसाद | वारंवारिता | प्रमाण |
|---|---|---|---|
| 1 | होय | 95 | 15.83 : |
| 2 | नाही | 305 | 50.83: |
| 3 | माहित नाही | 200 | 33.34 : |
| | एकुण | 600 | 100 |

**उत्तर नाही असल्याच्या कारणाची मिमांसादर्शक सारणी**

| अ.क्र | प्रतिसाद | वारंवारिता |
|---|---|---|
| 1 | कर्तुत्वशिलतेचा अभाव | 305 |
| 2 | जनसंपर्काचा व संघटन कौशल्याचा अभाव | 305 |
| 3 | उच्च शिक्षणाचा अभाव | 195 |
| 4 | राजकिय दक्षाची वक्रदृष्टी | 260 |
| | एकूण | 1065 |

उपरोक्त सारणीवरून अध्ययन क्षेत्रातील नेतृत्वासंबंधी माहिती प्राप्त होते. इतर क्षेत्राप्रमाणे या क्षेत्रात राष्ट्रीय व राज्यस्तरावर चमकलेले नेतृत्व की ज्यांच्या कार्याची छाप जनमानसावर उमटलेली असते व सदर क्षेत्राचा नाव समोर येतो व त्या व्यक्तीचे नाव आपोआपच समोर येते हे त्याच्या कर्तृत्वाचे फलीत असते असे नेतृत्व निपजले आहे काय? यासंबंधीत 95 मतदार (15.83:) होकारार्थी मत देउन असे नेतृत्व या क्षेत्रातही आहे असे म्हणतात. तर 305 मतदार (50.83:) याविषयी शंका उपस्थित करून नकारात्मक मत नोंदवितात. तर 200 (33.34:) मतदार माहित नाही असे सांगुन राजकिय जाणीवेविषयी अजागृकता समोर आणतांना दिसतात. नकारात्मक मत मांडणाऱ्या एकून मतदारांपैकी 308 मतदारांनी प्रतिनीधींच्या कर्तुत्वशिलतेच्या अभावाला, 305 मतदार जनसंपर्क व संघटन कौशल्याच्या अभावाला, 195 मतदारांनी उच्चशिक्षणाला तर 260 मतदार राजकिय पक्षांच्या वक्रदृष्टीला कारणिभूत धरतात.

यावरून असे स्पष्ट होते की अध्ययन क्षेत्रात राष्ट्रीय व राज्यस्तरावर लौकीक प्राप्त नेतृत्व दिसून येत नाही. याचे कारण उमेदवारात असलेली व्यक्तिगत कमतरता होय. ज्यामुळे उमेदवार आपली विशिष्ट प्रतिष्ठा निर्माण करू शकले नाहीत व चमकदार नेतृत्व जनतेला देउ शकले नाहीत. दुसरे कारण म्हणजे राजकीय पक्षांची वक्रदृष्टी होय. या आदिवासी जमातीतील उमेदवारांना कोणतेही महत्वाचे पद न देता त्यांना स्वतःच्या नेतृत्वाला चालना मिळू न देण्याची केलेली मानसिकता हे आहे. या जमातीतील उमेदवारांना तशी संधी प्राप्त झाली असती तर त्याचे नेतृत्व राज्य व राष्ट्रीय स्तरावर विकसीत होत गेले असते. परंतु उपरोक्त कारणांमुळे अध्ययन क्षेत्र योग्य नेतृत्वाच्या प्रतिक्षेत आहे. ही प्रतिक्षा केव्हा संपेल याची अनिश्चितता आहे. कारण सुदृढतेअभावी अध्ययन क्षेत्र अनेक समस्याग्रस्त आहे. याकडे लक्ष देणारा नेता निर्माण होणे आवश्यक आहे.

अहेरी भागात आत्राम घराण्याचा अपवाद वगळल्यास जिल्हयाच्या उर्वरीत राजकारणात राज्यस्तरीय व राष्ट्रस्तरीय नेतृत्वात बदल झालेले दिसून येतात. लोकप्रतिनिधीची अकार्यक्षमता, लोकांच्या प्रश्नाविषयी संवेदना नसणे, मतदारांना गृहीत न धरणे, समस्यांच्या परिवर्तनाबाबत वेळकाढुपणा करणे या दोषांमुळे लोकप्रतिनिधी बदललेलं दिसून येतात.

**निष्कर्ष :—**

(1) संशोधन क्षेत्रातील लोकप्रतिनिधींचा विकास कार्याच्या बाबतीत उदासिन असून अधिक कार्यक्षमतेने मिळालेल्या संधीचा फायदा घेतांना दिसून येत नाहीत. म्हणूनच निरंतर नेतृत्व बदल होतांना दिसून येते.

(2) कार्यक्षम नेतृत्वाअभावी व नौकरशाहीच्या कामचुकारपणामुळे अध्ययन क्षेत्रात अनेक मुलभुत समस्या आवासुन उभ्या आहेत. देश स्वतंत्र हो७न 65 वर्षाच्या कालखंड लोटला तरीपण या समुदायाला समस्यांना तोंड दयावे लागत आहे. शुध्द पाणी, विज, रस्ते, सिंचन, उद्योग, रोजगार, स्थलांतर, आरोग्य, शिक्षण अशा समस्या अजूनही आहेत.

(3) संशोधन क्षेत्रातील जमात स्वजातीचे नेतृत्व अजूनही त्यांच्या कार्यामुळे समाधानी नसल्याचे स्पष्ट मत मांडतांना दिसुन येत आहेत.

(4) संशोधन क्षत्रातील नेतृत्व त्यांच्या अकार्यक्षमतेमुळे ,उदासिनतेमुळे आपले विशिष्ट स्थान राज्य व राष्ट्रस्तरावर निर्माण करू शकलेले नाहीत. अन्यथा हे क्षेत्र इतके समस्याग्रस्त नसते.

**संदर्भ :—**

1) डॉ. सौ. शैलजा देवगांवकर, डॉ. शं. गो. देवगांवकर, 'आदिवासी विश्व' आनंद प्रकासन नागपूर, पृ. क्र. 196.
2) प्रा. ठाकूर सुंदरसिह, 'आदिवासी समाजाचे समाजशास्त्र' निर्मळ प्रकाशन नांदेड, प्रथमावृत्ती 2006 पृ. क्र. 282.
3) डॉ. सौ. शैलजा देवगांवकर, डॉ. शं. गो. देवगांवकर, 'आदिवासी विश्व' आनंद प्रकासन नागपूर,पृ. क्र. 200